**अमरावती महानगरपालिका अमरावती**

**कोटेशन नोटीस ( तीसरी वेळ )**

जा क्र- अमनपा/मबावि/ 438 /2023, दिनांक :- 21 /09 /2023

महिला व बालविकास विभाग, महानगरपालिका अमरावती अंतर्गत खालील प्रमाणे कार्य करावयाचे आहे. तरी ज्यांना काम करावयाचे असेल त्यांनी आपआपले सीलबंद कोटेशन महिला व बालविकास अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक 25 / 9 /2023 रोजी दुपारी 12 वाजेपर्यंत आणुन द्यावे. मुदतीनंतर आलेले दरपत्रक स्वीकारण्यात येणार नाही.

| क्र | कामाचे नाव | खर्चाचा अंदाज |
|---|---|---|
| 1 | महानगरपालिका अंतर्गत मुली व युवतींकरीता संगणक प्रशिक्षण MSCIT राबविणे . | प्रती प्रशिक्षणार्थी सर्व खर्चासह व शासकीय करांसह दर सादर करावे . |

दरपत्रकासोबत जोडावयाचे आवश्यक कागदपत्र :-

1. दरपत्रक सादर करणारी संस्था व प्रशिक्षण केंद्र अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील असावी. ( पुरावा आवश्यक )
2. संस्था नोंदणी प्रमाणपत्र ( कंपनी ॲक्ट / धर्मदाय आयुक्त/ इतर शासन मान्य )
3. संस्था मान्यता प्राप्त वरील कामाचे संगणक प्रशिक्षण केंद्रधारक असावी.( प्रमाणपत्र जोडावे )
4. संस्थेचे मागील 03 वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल.
5. GST नोंदणी प्रमाणपत्र ( लागु नस्लयास पुराव्यासह सादर करावे )
6. दुकाने व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक ( Shop – Act License)
7. शासकीय विभागात किमान 500 लाभार्थ्यांना प्रशिक्षण दिल्याचे अनुभव प्रमाणपत्र आवश्यक
8. संस्थेचे / संस्थाचालकाचे पॅन कार्ड .
9. संस्थाचालकाचे आधार कार्ड.
10. प्रशिक्षणासंबंधी आवश्यक यंत्रसामुग्री व प्रशिक्षीत प्रशिक्षक असल्याचा पुरावा व यादी आवश्यक
11. प्रशिक्षण केंद्राचा व्यवस्थेचा व इमारतीचा जीओ टॅग फोटो
12. दरपत्रक सादर करणारी संस्था कोणत्याही शासकीय विभागात काळया यादीत (Black Listed ) नसल्याचे तसेच सोबत जोडलेले कागदपत्र सत्य असल्याचे शपथपत्र .(100 रु- स्टॅम्प पेपरवर)

अटी व शर्ती :-

1. सदर प्रशिक्षण करीता प्रशिक्षण देण्यासाठी केवळ अमरावती महागनरपालिका क्षेत्रातील संबंधीत शासनमान्य संस्थांनीच दरपत्रक सादर करावे .
2. अमरावती मनपा क्षेत्रातील लाभार्थींकरीता योजना असल्याने पाच झोननिहाय प्रशिक्षण केंद्रांची दरपत्रक सादर करणारे संस्थेकडे व्यवस्था असावी. अथवा त्याप्रमाणे व्यवस्था करणे बंधनकारक राहिल.
3. प्रशिक्षणार्थी महिला असल्याने प्रशिक्षणस्थळी सुरक्षा व सुवीधेची सर्व व्यवस्था असणे आवश्यक राहील.
4. प्रशिक्षणस्थळी कोणताही अनुचीत प्रकार घडल्यास त्यास मनपा त्याकरीता जबाबदार राहणार नाही त्याचीसर्वस्वी जबाबदारी दरपत्रक धारक संस्थेची राहील.

Scanned with OKEN Scanner